नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १७६ Issue - 176 | वार शनिवार दि. १५ नोव्हेंबर २०२५ Blow- Saturday Date 15 November 2025 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# बिहारमध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत

## बिहारमध्ये भाजप पहिल्यांदाच पहिल्या क्रमांकावर; महागठबंधन हरले



मुंबई : बिहार विधानसभा निवडणुकांच्या निकालात भाजप एनडीएने मोठा विजय मिळवला असून भाजपच मोठा भाऊ ठरला आहे. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत एनडीएमध्ये भाजप, जयदू, एलजेपी, एचएएम आणि आरएलएम या ५ पक्षांची एनडीए आघाडी होती. एनडीएमधील सर्वच पक्षांना गत २०२० च्या विधानसभा निवडणुकांच्या तुलनेत यंदा चांगलं यश मिळाल्याचं दिसून येत आहे. राज्यातील २४३ जागांपैकी यंदा भाजप आणि जदयूने १०२ जागांवर उमेदवार मैदानात उतरवले होते. तर, चिराग पासवान यांच्या लोकजनशक्तीने २९ उमेदवारांना तिकीट दिले. तसेच, हिंदुस्तानी आवाम मोर्चाने ६ आणि आरएलएमने ४ उमेदवारांना उमेदवारी दिली होती. त्यामध्ये, एनडीए आघाडीला २०० पेक्षा जास्त जागांवर विजय मिळत असल्याचे दिसते. त्यामध्ये, भाजप ९१ तर नितीशकुमार यांच्या जदयूला ७९ जागांवर आघाडी असल्याचे दिसून येते.

बिहारमध्ये एकूण ६६.९१ टक्के मतदान- बिहारमध्ये पहिल्या टप्प्यात १८ जिल्ह्यातील १२१ मतदारसंघात ६५.०८ टक्के मतदान पार पडलं आहे. दुसऱ्या टप्प्यात २० जिल्ह्यातील १२२ जागांवर ६८.७६ टक्के मतदान झालं आहे. निवडणूक आयोगाच्या आकडेवारीनुसार बिहारमध्ये एकूण ६६.९१ टक्के मतदान झालं आहे.

बिहार विधानसभा निवडणुकांध्ये एनडीए आणि महागठबंधन यांच्यात थेट लढत झाली. या निवडणुकीत एनडीए आघाडीला मोठं यश मिळत असल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे, भाजप आणि नितीश कुमार यांच्या राजद पक्षाने विजयाचा जल्लोष सुरू केला आहे. तर, काँग्रेस आणि तेजस्वी यादव यांच्या राजदमध्ये पराभवाचा लवलेश दिसून येत आहे. काँग्रेस महागठबंधनमध्ये तेजस्वी यादव यांच्या आरजेडीने १४३ जागा लढवल्या तर काँग्रेसने ६०, सीपीआय माले-२०, व्हिआयपी ११, सीपीआय ६ आणि सीपीएमने ४ जागांवर आपले उमेदवार उभे केले होते. मात्र, महागठबंधनला अपेक्षित यश मिळाले नाही. याउलट भाजप एनडीए आघाडीने मोठा विजय मिळवला आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीत गत २०२० मध्ये नितीश कुमार यांच्या जदयु पक्षाने केवळ ४३ जागांवर विजय मिळवला होता, तर भाजपला ७४ जागा जिंकता आल्या होत्या. मात्र, यंदा २०२५ च्या निवडणुकीत जदयूला ८० जागांवर आघाडी दिसून येत आहे. म्हणजेच गत निवडणुकीपेक्षा ३० पेक्षा जास्त जागा जिंकण्याचा अंदाज आहे. तर, भाजपला ९५ जागांवर विजय मिळत असल्याचं पाहायला मिळत आहे. एनडीए आघाडीने गत निवडणुकीत २४३ पैकी १२५ जागांवर विजय मिळवला होता. त्यामध्ये, हिंदुस्तानी आवाम मोर्चा ४ आणि विकासशील इंसान मोर्चाने ४ जागांवर विजय मिळवला होता. यंदाही भाजप एनडीए आघाडीला २०० पेक्षा जास्त जागांवर विजय मिळत असल्याचं दिसून येत आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस दिल्लीत; महाराष्ट्राला मिळणार २६५५ कोटी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : देशाचं लक्ष बिहारच्या निवडणुकांकडे लागले असून भाजप एनडीए आघाडीने आज मोठं बहुमत मिळवलं आहे. त्याच पार्श्वभूमीवर आणि महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्ली दौऱ्यावर आहेत. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर यांची मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे भेट घेत पायाभूत सुविधांच्या संशोधित वीज वितरण क्षेत्र योजनेसाठी (आरडीएसएस) महाराष्ट्राला २६५५ कोटी रुपये देण्याची मागणी केली. लवकरच हा निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सोबतच ८००० मेगावॅट तास क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठी सुद्धा सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्र्यांनी दिले. नवीनीकरणीय ऊर्जा प्रकल्पात निर्माण झालेली अतिरिक्त वीज बॅटरी स्टोरेज साठवून कमाल मागणीच्या वेळी ती वापरली जाते. यात ४५०० मे.वॅ. तास क्षमतेच्या अशा प्रकल्पासाठी केंद्राने यापूर्वीच व्यवहार्यता तूट निधी मंजूर केला आहे. त्याच्या निविदाही जारी करण्यात आल्या आहेत. आता अशा प्रकारचा ८००० मे.वॅ. तास क्षमतेचा आणखी एक प्रकल्प महावितरण उभारत आहे. त्यासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठी केंद्र सरकार मदत करेल, असे मनोहरलाल खट्टर यांनी सांगितले. सौर ऊर्जा पारेषण जाळ्यातून नेण्यासाठीचे प्रकल्प, राज्यातील १८ मोठे सौर प्रकल्प, ग्रीडच्या तांत्रिक अडचणींवर उपाय अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा झाली. या बैठकीत महाराष्ट्रातर्फे ऊर्जा क्षेत्रात हाती घेण्यात आलेल्या विविध उपाययोजनांची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. यात संसाधन पर्याप्तता आराखडा, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, बॅटरी एनर्जी स्टोरेज सिस्टीम (बीईएसएस), पंपस्टोरेज प्रकल्प इत्यादींचा त्यात समावेश होता. दरम्यान, या बैठकीत केंद्रीय ऊर्जा सचिव पंकज अग्रवाल, महावितरणचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक लोकेशचंद्र, एनटीपीसीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक गुरुदीपसिंग आणि अन्य वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# खोट्याचा पराभव, जनविश्वासाचा विजय : पंतप्रधान मोदी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : भाजपप्रणित एनडीएला बिहारमध्ये प्रचंड मोठं यश आलं आहे. या यशानंतर दिल्लीत भाजपच्या मुख्यालयात जल्लोष करण्यात आला. या विजयाच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या मुख्यालयात कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संबोधित केलं. यावेळी त्यांनी बिहारच्या जनतेचे मनापासून आभार मानले. तसेच नरेंद्र मोदी यांनी यावेळी सर्वपक्षीय नेत्यांना मोलाचं आवाहन केलं आहे. निवडणूक आयोगाकडून बिहारमध्ये मतदारयाद्यांबाबत जे काम सुरु आहे त्यामध्ये मदत करण्याचं आवाहन नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. मोदी यांनी यावेळी विरोधकांवरही निशाणा साधला.

यावेळी दोन टप्प्यांच्या निवडणुकीत कुठेही पुन्हा मतदान घेण्याची वेळ आली नाही. यावेळी अतिशय शांतपूर्ण वातावरणात मतदान झालं. त्यामुळे मी निवडणूक आयोग, निवडणुकीसोबत जुळलेले सर्व कर्मचारी, सुरक्षा दल, बिहारचे जागृत मतदार अशा सर्वांचे अभिनंदन करतो. देशाला तुमच्या सर्वांवर गर्व आहे. हे मी गर्वाने सांगू इच्छितो, असं नरेंद्र मोदी म्हणाले. **(पान २ वर...)**

# दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणात मोठी कारवाई, आरोपी डॉक्टर उमरचे पुलवामातील घर सुरक्षा दलांनी उडवलं!



नवी दिल्ली : दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ कार बॉम्बस्फोट घडवणारा दहशतवादी डॉ. उमर मोहम्मद याचे पुलवामा येथील घर सुरक्षा यंत्रणांनी आयईडीने उडवून दिले आहे. दहशतवादाविरुद्धच्या कारवाईचा एक भाग म्हणून, सुरक्षा दलांनी परिसराला वेढा घातला आणि संपूर्ण कारवाई नियंत्रित पद्धतीने पार पाडली.

या स्फोटाच्या तपासात अनेक महत्त्वाचे खुलासे झाले आहेत. गुरुवारी फरीदाबादमधील अल-फलाह विद्यापीठाच्या पार्किंगमध्ये या स्फोटाशी संबंधित आणखी एक कार आढळली. पोलिसांच्या माहितीनुसार, ही कार डॉ. शाहीन शाहिद यांच्या नावावर नोंदणीकृत आहे, त्याला व्हाइट कॉलर टेरर मॉड्यूल प्रकरणात आधीच अटक करण्यात आली आहे. फरीदाबाद पोलिसांनी सांगितले की, जम्मू आणि काश्मीर पोलिस विद्यापीठात सापडलेल्या संशयास्पद मारुती ब्रेझा कारची चौकशी करत आहेत. संशयास्पद कार आढळल्यानंतर, बॉम्ब शोध पथकाला वाहनाची तपासणी करण्यासाठी पाचारण करण्यात आले. विद्यापीठ कॅम्पसमध्ये पार्क केलेल्या इतर वाहनांची देखील तपासणी केली जात आहे आणि त्यांच्या मालकांची माहिती पडताळली जात आहे.


तपासातून असे दिसून आले आहे की, स्फोटातील मुख्य आरोपी डॉ. उमर मोहम्मद, डॉ. मुझम्मिल अहमद आणि डॉ. शाहीन शाहिदने एन्क्रिप्टेड स्विस मेसेजिंग ॲप वापरून दहशतवादी मोहिमेचे नियोजन आणि समन्वय साधला होता. स्फोटस्थळावरून मिळालेल्या डीएनए नमुन्यांवरून लाल किल्ल्याजवळ स्फोट झालेली पांढऱ्या रंगाची हुंडई ळ-२० कार डॉ. उमर चालवत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

गुरुवारी हरियाणातील नुह येथेही छापे टाकण्यात आले, जिथे पिनांगवा येथील एका खत आणि बियाणे विक्रेत्याला ताब्यात घेण्यात आले. आरोपींनी या दुकानातून मोठ्या प्रमाणात एनपीके खत खरेदी केल्याचा संशय आहे. शिवाय, बुधवारी, तपास पथकाने फरिदाबादच्या खंडावली गावात मॉड्यूलची दुसरी कार लाल रंगाची फोर्ड इकोस्पोर्ट जप्त केली. फरिदाबाद पोलिसांनी ही कार गावात पार्क करणाऱ्या व्यक्तीला अटक केली आणि ती दिल्ली पोलिसांच्या ताब्यात दिली. तपासात असे दिसून आले की, दहशतवाद्यांनी आयईडी वाहतूक करण्यासाठी तीन कार खरेदी केल्या होत्या. परिणामी, दिल्ली पोलिसांनी शहरातील सर्व पोलीस स्टेशन, चौक्या आणि सीमावर्ती भागात अलर्ट जारी केला आहे.

**बिहारमध्येही दीड कोटी महिलांना निवडणुकीच्या तोंडावर रोख १० हजारांनी विरोधकांचा गेम**

# महाराष्ट्रात लाडक्या बहिणींच्या १५०० रुपयांनी अवघी निवडणूक फिरली

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



नवी दिल्ली : बिहार निवडणुकीच्या तोंडावर ७५ लाख महिलांना प्रत्येकी १० हजार रुपये थेट त्यांच्या खात्यात जमा झाले. ही रक्कम मुख्यमंत्री महिला रोजगार योजना अंतर्गत देण्यात आली. महिलांना स्वयंरोजगार सुरू करण्यासाठी आणि लघु उद्योग चालवण्यासाठी आर्थिक मदत करणे हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. या योजनेअंतर्गत, सुमारे १.५ कोटी महिलांना कोणत्याही परतफेडीच्या बंधनाशिवाय १०,००० रुपयांची आर्थिक मदत मिळाली आहे. आता हीच रक्कम बिहारमध्ये टर्निंग पॉईंट ठरल्याची चर्चा आहे. बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएनं सत्ता राखण्याच्या दिशेनं वाटचाल सुरु केली आहे. बिहारमधील महिलांना ही रक्कम थेट लाभ हस्तांतरण द्वारे थेट महिलांच्या बँक खात्यात हस्तांतरित केली जाते. ही योजना २९ ऑगस्ट २०२५ रोजी सुरू करण्यात आली आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ती व्हर्च्युअल पद्धतीने सुरू केली. डिसेंबर २०२५ पर्यंत शक्य तितक्या पात्र महिलांना या योजनेत समाविष्ट करण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे.

बिहारमधील महिलांसाठी इतर योजना : नीतीश कुमार सरकारच्या अंतर्गत महिला सक्षमीकरणासाठी अनेक योजना आहेत, त्यापैकी सर्वात प्रमुख आहेत: मुख्यमंत्री महिला रोजगार योजना: महिलांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत प्रदान करते. जीविका स्वयं-सहायता गटांद्वारे महिला सक्षमीकरण. पंचायत आणि नगरपालिका निवडणुकांमध्ये ५० टक्के आरक्षण देऊन महिलांना नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देणे. महिलांना त्यांच्या व्यवसायाच्या यशासाठी प्रशिक्षण आणि मार्केटिंग सहाय्य प्रदान करणे.

नीतीश कुमार महिलांमध्ये लोकप्रिय आहेत कारण त्यांचे सरकार त्यांच्या बँक खात्यात १०,००० रुपयांचे थेट हस्तांतरण यासारखे भरीव आर्थिक सहाय्य प्रदान करते. महिलांना स्वयंरोजगार आणि उद्योजक बनण्यास प्रोत्साहित करणे, स्थानिक महिला गटांद्वारे व्यापक सक्षमीकरण आणि महिलांसाठी आरक्षणासह नेतृत्वाच्या संधी उपलब्ध करून देणे हे त्यांच्या लोकप्रियतेला कारणीभूत ठरणारे प्रमुख घटक आहेत. शिवाय, इतर गटांपेक्षा महिलांचे मतदानाचे प्रमाण जास्त आहे आणि स्थिर प्रशासन आणि मूर्त आर्थिक फायदे देणाऱ्या सरकारांकडे त्यांचा कल आहे, ज्यामुळे नितीश कुमार यांची लोकप्रियता अबाधित आहे.

बिहारमध्ये मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत सुमारे १.५ कोटी महिलांना प्रत्येकी १०,००० रुपये मिळाले आहेत. ही रक्कम कोणत्याही परतफेडीच्या बंधनाशिवाय थेट महिलांच्या बँक खात्यात हस्तांतरित करण्यात आली, ज्यामुळे त्यांना स्वयंरोजगार सुरू करता आला आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम होता आले. अलिकडेच, ही रक्कम निवडणुकीपूर्वी ७५ लाख महिलांच्या खात्यात हस्तांतरित करण्यात आली, ज्यामुळे या योजनेची व्यापक पोहोच आणि परिणाम दिसून येतो. बिहार विधानसभा निवडणुकीची घोषणा तारीख १० ऑक्टोबर २०२५ होती. निवडणूक आयोगाने या तारखेला अधिकृतपणे निवडणुका जाहीर केल्या, त्यानंतर उमेदवारांचे नामांकन, नामांकन पत्रांची छाननी आणि माघार घेण्याच्या तारखा निश्चित करण्यात आल्या. मतदान दोन टप्प्यात झाले. पहिला टप्पा ६ नोव्हेंबर २०२५ रोजी आणि दुसरा टप्पा ११ नोव्हेंबर २०२५ रोजी. निवडणुकीचे निकाल आज १४ नोव्हेंबर २०२५ रोजी जाहीर झाले.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक

प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप वापरा व हमखास निवडून या.
फक्त आमच्या कडेच

मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी, पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५. स्टिकर ६. पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

# विकासाला गती

देशाचं लक्ष बिहारच्या निवडणुकांकडे लागले असून भाजप एनडीए आघाडीने आज मोठं बहुमत मिळवलं आहे. त्याच पार्श्वभूमीवर आणि महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान सोहळ्याच्या निमित्ताने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिल्ली दौऱ्यावर आहेत. केंद्रीय ऊर्जामंत्री मनोहरलाल खट्टर यांची मुख्यमंत्री फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे भेट घेत पायाभूत सुविधांच्या संशोधित वीज वितरण क्षेत्र योजनेसाठी (आरडीएसएस) महाराष्ट्राला २६५५ कोटी रुपये देण्याची मागणी केली. लवकरच हा निधी देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. सोबतच ८००० मेगावॅट तास क्षमतेच्या बॅटरी स्टोरेज प्रकल्पासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठी सुद्धा सकारात्मक कार्यवाही करण्याचे आश्वासन केंद्रीय मंत्र्यांनी दिले. नवीनीकरणीय ऊर्जा प्रकल्पात निर्माण झालेली अतिरिक्त वीज बॅटरी स्टोरेज साठवून कमाल मागणीच्या वेळी ती वापरली जाते. यात ४५०० मे.वॅ. तास क्षमतेच्या अशा प्रकल्पासाठी केंद्राने यापूर्वीच व्यवहार्यता तूट निधी मंजूर केला आहे. त्याच्या निविदाही जारी करण्यात आल्या आहेत. आता अशा प्रकारचा ८००० मे.वॅ. तास क्षमतेचा आणखी एक प्रकल्प महावितरण उभारत आहे. त्यासाठी व्यवहार्यता तूट निधी देण्यासाठी केंद्र सरकार मदत करेल, असे मनोहरलाल खट्टर यांनी सांगितले. सौर ऊर्जा पारेषण जाळ्यातून नेण्यासाठीचे प्रकल्प, राज्यातील १८ मोठे सौर प्रकल्प, ग्रीडच्या तांत्रिक अडचणींवर उपाय अशा विविध विषयांवर यावेळी चर्चा झाली.

## खोट्याचा पराभव, जनविश्वासाचा विजय : पंतप्रधान मोदी

(पान १ वरून..) बिहारच्या निवडणुकीने एक आणखी बात सिद्ध केली आहे, देशाचा तरुण मतदाता मतदार यादीच्या शुद्धीकरणाला गंभीरतेने घेत आहे. बिहारच्या मतदारांनी मतदारयाद्यांच्या शुद्धीकरणासाठी जबरदस्त पाठिंबा दिला आहे. लोकशाहीच्या पवित्रतेसाठी प्रत्येक मतदाराचं महत्त्व असतं. त्याचा तो अधिकार असतो. आता प्रत्येक पक्षाचं कर्तव्य आहे की, त्यांनी पोलिंग बुथवर आपापल्या पक्षांना सक्रिय करावं आणि मतदारयादीच्या शुद्धीकरणाच्या कामात उत्साहाने जुळावं. या कार्यात आपलं शंभर टक्के योगदान द्यावं. जेणेकरुन बाकी ठिकाणी देखील मतदारयाद्यांचं शुद्धीकरण होऊ शकेल, असं आवाहन नरेंद्र मोदी यांनी केलं. बिहार ती धरती आहे ज्या ठिकाणी भारताला लोकशाहीची जननी होण्याचा गौरव दिला आहे. आज त्याच धरतीने लोकशाहीवर हल्ला करणाऱ्या ताकदीला धूळ चारली आहे. बिहारने पुन्हा एकदा दाखवलं आहे की, खोट्याचा पराभव होतो. जनविश्वासाचा विजय होतो. जामीनवर असणाऱ्या लोकांना जनता साथ देणार नाही, हे बिहारने ठळकपणे सांगितलं आहे, असं नरेंद्र मोदी म्हणाले.

बिहारच्या भूमीत आता पुन्हा कधी जंगलराज येणार नाही. आजचा विजय बिहारच्या माता, भगिनींची आहे ज्यांनी जंगलराजचा आतंग सहन केला आहे. हा विजय बिहारच्या तरुणाचा आहे ज्याच्या भविष्याला काँग्रेस आणि लाल झेंड्यावाल्यांच्या दहशतीने बरबाद केलं. आता ते दिवस इतिहास बनले आहेत. बिहार विकासाच्या रस्त्याने पुढे धावत आहे. आता ही यात्रा थांबणारी नाही, असंदेखील मोदी यावेळी म्हणाले.

# स्थानिक स्वराज्य संस्था सार्वत्रिक निवडणूक

## माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती : निष्पक्ष निवडणुकीचा पाया

**लेख मालिका - भाग एक**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राज्यात सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची सुरुवात होत असतांना नगरपरिषद आणि नगरपंचायती निवडणुका जाहीर झाल्या आहेत, या निवडणुका निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणात पार पाडण्याच्यादृष्टीने सर्व राजकीय पक्ष व उमेदवारांना समान संधी मिळण्याकरिता निवडणूकविषयक सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी, प्रकरणांची चौकशी व त्यांचे निराकरण तसेच विविध प्रसारमाधमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत संनियंत्रण आणि समाजमाध्यमांसंदर्भात देखरेख करण्यासाठी यामध्ये राज्यस्तरीय, महानगरपालिकास्तरीय, जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समित्या कार्यरत असतात. या समितीच्या कामकाजाविषयी माहिती देणारा लेख चार भागात क्रमशः प्रसारित करण्यात येत आहे.

जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समिती : नगरपरिषदा, नगरपंचायती, जिल्हा परिषदा, पंचायत समित्या व ग्रामपंचायत निवडणुकांकरिता इलेक्ट्रॉनिक माध्यमांसाठीच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणन, पेड न्यूजसंदर्भातील तक्रारी, प्रकरणांची चौकशी व त्यांचे निराकरण तसेच विविध प्रसारमाध्यमांतील वृत्तांकनाच्या संकेतांच्या पालनाबाबत समाजमाध्यमसंदर्भात देखरेख करणारी समिती असते. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती कार्यरत असून यामध्ये जिल्हा पोलीस अधीक्षक किंवा त्यांचे प्रतिनिधी, जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेला अपर जिल्हाधिकारी अथवा उपजिल्हाधिकारी दर्जाचा अधिकारी, संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी, संबंधित तहसीलदार अथवा नगरपरिषद, नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे सदस्य तर जिल्हा माहिती अधिकारी हे सदस्य सचिव म्हणून कामकाज करणार आहेत.

इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित, प्रसिद्ध करावयाच्या प्रस्तावित जाहिरातींचे पूर्वप्रमाणनः सर्व प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे प्रसारित, प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक विषयक जाहिरातींचे माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडून पूर्वप्रमाणन करून घेणे आवश्यक आहे. तथापि भारतीय संविधानाची पायमल्ली, केंद्र, राज्य शासनाच्या कायद्यांचे उल्लंघन, राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशांची पायमल्ली, धर्म, वंश, जात, लिंग, भाषा, पेहराव इत्यादींच्या आधारे तेढ अथवा शत्रुत्वाची शक्यता, प्रार्थनास्थळांचे छायाचित्र, छायाचित्रणाचा समावेश, कायदा व सुव्यवस्थेला आव्हान, हिंसेला प्रोत्साहन, शांततेचा भंग, न्यायालयाचा अथवा एखाद्या व्यक्ती किंवा संस्थेची बदनामी, देशाच्या ऐक्याला, सार्वभौमत्वाला आणि राष्ट्रीय एकात्मतेला बाधा, अन्य कुठल्याही देशावर टिका, अवमानजनक टिप्पणी अथवा तिरस्कारपूर्ण विधान, संरक्षण दलाच्या अधिकारी, कर्मचारी अथवा संरक्षण दलाचे छायाचित्र, छायाचित्रण, राजकीय पक्ष, राजकीय नेता किंवा अन्य कोणावरही खोटे आरोप, कुठल्याही राजकीय नेत्याच्या अथवा व्यक्तीच्या खाजगी आयुष्यात हस्तक्षेप, नीतिमत्ता व सभ्यतेचे उल्लंघन, अश्लिलतेला प्रोत्साहन अशा स्वरूपाच्या आशयाचा समावेश असलेल्या जाहिराती प्रसारित, प्रसिद्ध करता येणार नाहीत तसेच अशा स्वरुपाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमाणनही केले जाणार नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक, पोटनिवडणुकांसंदर्भातील प्रस्तावित जाहिरातीचे संबंधित समितीने पूर्वप्रमाणन केले नसल्यास, अशा जाहिरातीचे प्रसारमाध्यमांना प्रसारण, प्रसिद्धी करता येणार नाही. निवडणूकविषयक जाहिरातीवर राजकीय पक्षाने खर्च केला असल्यास त्याचा समावेश पक्षाच्या तर उमेदवाराने खर्च केला असल्यास त्याचा समावेश उमेदवाराच्या निवडणूक खर्चात करणे आवश्यक आहे.

एखाद्या व्यक्तीस किंवा मतदारास आपल्या वैयक्तिक समाज माध्यम खात्यावरुन (सोशल मीडिया हँडल) राजकीय मत व्यक्त करण्यास साधारणतः कुठलेही बंधन नाही. (मात्र, त्यातून कायदा सुव्यवस्था, सभ्यता, नीतिमत्ता, निवडणुकीत अडथळा, अपराधास चिथावणी आदीसंदर्भात प्रश्न उपस्थित होता कामा नये. त्याचबरोबर अब्रुनुकसान किंवा न्यायालयाचा अवमान होणार नाही, याबाबत दक्षता घेणे आवश्यक राहील.) त्यास राजकीय जाहिरात म्हणून समजले जाणार नाही. त्यामुळे त्यास पूर्वप्रमाणनाची आवश्यकता नाही; परंतु निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून कुठल्याही व्यक्ती, मतदारास एखाद्या राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या प्रचारार्थ त्या राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या लेखी परवानगीशिवाय परस्पर जाहिरात किंवा प्रचार करता येणार नाही. तशी जाहिरात किंवा तसा प्रचार करावयाचे असल्यास तिचे पूर्वप्रमाणन करणे बंधनकारक असेल व त्या प्रस्तावित जाहिरातीचा किंवा प्रचाराचा खर्च यथास्थिती संबंधित राजकीय पक्ष किंवा उमेदवारांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करणे आवश्यक राहील.

प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी अर्ज : प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी जिल्हा माहिती कार्यालय, पुणे येथे जिल्हा माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीचे कामकाज सुरु करण्यात आले असून या समितीकडे परिशिष्ट ४ प्रमाणे विहित नमुन्यात अर्ज करता सादर करावे. जाहिरात विशिष्ट नगरपरिषद, नगरपंचायत, जिल्हा परिषद, पंचायत समिती, ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक पोटनिवडणुकीसाठी एखाद्या राजकीय पक्षाची अथवा या निवडणुकांतील एक किंवा एकापेक्षा जास्त उमेदवारांसाठी असल्यास अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी संबंधित जिल्हास्तरीय समितीकडे अर्ज करावा लागेल. जाहिरात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या १० किंवा त्यापेक्षा कमी नगरपरिषद, नगरपंचायत अशा प्रस्तावित जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासाठी समितीकडे स्वतंत्र अर्ज करावा लागेल.

जाहिरात पूर्वप्रमाणकरिता किमान ५ दिवस आधी समितीकडे अर्ज सादर करावे : जाहिरात प्रसारित, प्रसिद्ध करण्याच्या दिनांकापूर्वी कार्यालयीन कामकाजाच्या किमान ५ दिवस आधी संबंधित समितीकडे तिच्या पूर्वप्रमाणनासाठी अर्ज करावा. पूर्वप्रमाणनाच्या अर्जासोबत प्रस्तावित जाहिरातीची इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रत आणि राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती (प्रिंट) जोडाव्यात. 'जाहिरात प्रसारण, प्रसिद्धीसाठी येणाऱ्या खर्चाची सर्व देयके, धनादेश, धनाकर्ष, ऑनलाईन पद्धतीने अदा करण्यात येतील. कुठल्याही परिस्थितीत ही देयके रोकड स्वरूपात अदा करण्यात येणार नाहीत, असे पूर्वप्रमाणनासाठीच्या अर्जात (परिशिष्ट- ४) नमूद करणे बंधनकारक राहील.

मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेव्यतिरिक्त अन्य भाषेतील प्रस्तावित जाहिरातीचे पूर्वप्रमाणन करण्यासाठी अर्ज सादर करताना संबंधित भाषेतील जाहिरातीच्या इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील दोन प्रती सादर कराव्यात. त्याचबरोबर त्या जाहिरात संहितेचा मराठी, हिंदी किंवा इंग्रजी भाषेत अनुवाद करून राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्याने किंवा उमेदवाराने साक्षांकित केलेल्या जाहिरात संहितेच्या दोन मुद्रित प्रती (प्रिंट) जोडाव्यात. त्यासोबत सदर प्रस्तावित जाहिरातीचा मराठी, हिंदी आणि इंग्रजी भाषेत यथार्थ अनुवाद करण्यात आला असून, कोणत्याही चुकांकरिता अर्जदार जबाबदार असेल, असे निश्चियपूर्वक कथन करण्यात येत आहे, असे नोटराईज्ड प्रतिज्ञापत्र परिशिष्ट-५ प्रमाणे सादर करणे आवश्यक असेल.

जाहिरात पूर्वप्रमाणनाचा अर्ज निकाली काढणे : जाहिरात पूर्वप्रमणनाचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर तो कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसांच्या आत संबंधित समितीद्वारे निकालात काढण्यात येईल. अर्ज निकाली काढताना समिती, जाहिरातीचा कोणताही भाग वगळेल अथवा फेरबदल करेल किंवा दुरूस्ती सूचवेल त्यानुसार कार्यवाही करणे संबंधित राजकीय पक्ष, उमेदवार, अर्जदारावर बंधनकारक असेल. समितीने पूर्वप्रमाणन मंजूर केल्यास प्रस्तावित जाहिरातीच्या प्रसारण, प्रसिद्धीसाठी परिशिष्ट-६ प्रमाणे प्रमाणपत्र देण्यात येईल.

जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासंदर्भातील समितीच्या निर्णयाविरुद्ध अपील : जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनासंदर्भात जिल्हास्तरीय, महानगरपालिकास्तरीय समितीचा निर्णय मान्य नसल्यास संबंधित राजकीय पक्ष, उमेदवार, अर्जदारास त्याबाबत कार्यालयीन कामकाजाच्या ३ दिवसांच्या आत राज्यस्तरीय माध्यम प्रमाणन व संनियंत्रण समितीकडे अपील दाखल करता येईल. राज्यस्तरीय समिती नैसर्गिक न्यायाच्या तत्वाचे अवलंब करुन गुणवत्तेच्या आधारे अपिलावर निर्णय घेऊन संबंधितास अवगत करेल.

पूर्वप्रमाणन केलेल्या जाहिरातींचे प्रसारण, प्रसिद्धी थांबविणे : जाहिरातीच्या पूर्वप्रमाणनानंतर ती जाहिरात प्रसारित, प्रसिद्ध झाल्यावर या आदेशाचे किंवा कोणत्याही कायद्याचे उल्लंघन होत असल्याचे आढळल्यास, राज्य निवडणूक आयोग अथवा राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेला अधिकारी किंवा सक्षम प्राधिकारी अशा जाहिरातीचे प्रसारण, प्रसिद्धी थांबविण्याचे आदेश देईल व संबंधित साहित्य जप्त करण्याबरोबरच सर्व संबंधितांविरुद्ध कायदेशीर कार्यवाही करण्याचा मार्ग अनुसरेल.


मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करण्यात येणाऱ्या जाहिरातीः मुद्रित माध्यमांद्वारे प्रसिद्ध करावयाच्या जाहिरातींचे पूर्वप्रमणन करण्याची आवश्यकता नाही; परंतु अशा माध्यमातून जाहिराती प्रसिद्ध करताना आचारसंहिता किंवा संबंधित कायद्यांचे उल्लंघन होता कामा नये. राज्य निवडणूक आयोगाच्या दि. २८ ऑगस्ट १९९५ अनुसार प्रचारासाठी मुद्रित करण्यात येणाऱ्या साहित्याबाबत विहित केलेली कार्यपद्धती अनुसरणे आवश्यक आहे. प्रचार साहित्यावर प्रतींची संख्या, प्रत क्रमांक, मुद्रणालयाचे व प्रकाशकाचे नाव व पत्ता असणे आवश्यक आहे. या आदेशांचे पालन न झाल्याचे आढळल्यास 'प्रेस अ‍ॅक्ट' व वेळोवेळी करण्यात आलेल्या इतर अधिनियमांनुसार कार्यवाही केली जाईल.

**क्रमशः..**

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# दिल्लीतला भयानक स्फोटः वेदना, शंका आणि जबाबदारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



राजधानी दिल्लीच्या निःशब्द सकाळी अचानक झालेल्या एका कार स्फोटाने संपूर्ण देशाला हादरवून टाकले. धुराने भरलेल्या रस्त्यावर, किंचाळ्यांनी थरथरलेल्या आकाशाखाली, क्षणात घडलेली ती घटना फक्त शहराला नव्हे तर भारतीय जनमानसालाही हलवून गेली. ही घटना केवळ एका वाहनाच्या स्फोटाची नाही तर ती देशाच्या सुरक्षेवरील, राजनैतिक शिस्तीवरील आणि आपल्या सामूहिक असुरक्षिततेवरील कठोर प्रश्नचिन्ह आहे. दिल्लीच्या ऐतिहासिक रस्त्यावर, रेड फोर्टच्या जवळ एका कारमधून अचानक झालेल्या स्फोटाने अनेक जीवनं संपवली आणि हजारो लोकांच्या मनात भीतीची आणि असमंजसतेची झळ उभी केली आहे. हे केवळ एका क्षणातील भीषण घटना नाही तर ह्या देशाच्या सुरक्षिततेवरील आणि नागरिकांच्या दैनिक जिवनावरच्या हमखास परिणामांचाही प्रश्न आहे. सरकारने ही घटना आताही दहशतवादी घटना म्हणून मान्य केली असून तपासाच्या व्यापक यंत्रणेला आदेश देण्यात आले आहेत. या घटनेत मृतांची संख्या आणि जखमींचे वेदनादायी दृश्ये आपल्याला आठवण करून देतात की आतंकवाद म्हणजे फक्त संरचना भडकेस दाखवणारी क्रिया नव्हे, तर ते आपल्या समाजातील सर्वात सामान्य माणसांचे भविष्य, कुटुंब आणि स्वप्नांचे विघटन आहे. पहिल्या तासांतच लोकांनी आपापल्या नातेवाईकांची माहिती शोधली, हॉस्पिटल्सवर भावनिक रांगा केल्या आणि वार्तांनी शहरात घाबरलेले वातावरण पसरले. म्हणजेच, मानवी त्रास हा घटनापेक्षा कितीतरी पटीने मोठा असतो.

पोलिसांनी घटनास्थळावरून अनेक नमुने गोळा केले आहेत. वाहनाचे अवशेष, धातूचे तुकडे आणि फॉरेन्सिक तपासणीसाठी सुमारे चाळीसहून अधिक नमुने केंद्राकडे पाठवले गेले असून, प्राथमिक तपासात स्फोट अत्याधुनिक विस्फोटकाने झाल्याची शक्यता व्यक्त झाली आहे. एनआयए आणि दिल्ली पोलिसांचे पथक रात्रीपर्यंत शोधमोहीम राबवत आहे. तसेच, संशयित वाहन आणि त्याच्या मालकाच्या मागोमाग शेजारील राज्यांमध्ये आणि गावांमध्ये छापा मारण्यात आले आहेत; काही लोकांना ताब्यातही घेतल्याचे वृत्त आहे. ह्या प्राथमिक तपासांनी सूचित केले आहे की, या स्फोटाचा संदर्भ केवळ स्थानिक गुन्हेगारी नव्हे तर संघटनाबद्ध दहशतवादाशी संबंधित असण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे देशाच्या सुरक्षा यंत्रणांनी विशेष कायदे आणि राष्ट्रीय तपास संस्था या प्रकरणात सक्रिय केल्या. आता तपासाच्या दिशा दोन आहेत. पहिली, स्थानिक गुन्हेगारी टोळीचा हात आणि दुसरी, परदेशी दहशतवादी संघटनांशी संभाव्य संबंध.

मीडिया अहवालांनुसार प्राथमिक चौकशीत काही संशयित व्यक्ती आणि कनेक्शन पाकिस्तान-आधारित गटांशी जोडले जात आहेत. विशेषतः जैश-इ-मोहम्मद सारख्या संघटनांचा संदर्भ येत आहे, परंतु हे निष्कर्ष अद्याप अंतिम सिद्ध झालेले नाहीत. ही बाब अजून तपासाधीन आह आणि घाईघाईने निष्कर्ष काढणे म्हणजे न्यायाच्या प्रक्रियेला धक्का देणे होईल. तपासकांद्वारे पकडलेलेल्या व्यक्तींचे संबंध, संदेशवाहक, आणि आंतरराज्यीय हालचाली तपासल्या जात आहेत; परदेशी हाताचे आरोप करणे ही गंभीर बाब आहे आणि त्यासाठी ठोस दर्शने आवश्यक आहेत. माध्यमांच्या आळ्यानुसार आत्तापर्यंत काही ज्या तपास-उपक्रमांबाबत माहिती समोर आली आहे, त्यात पाकिस्तान-आधारित संघटनांचा संदर्भ आला आहे. परंतु हा तपास अजून प्रवाही व विस्तृत स्वरूपात आहे. भारताने नेहमीच आंतरराष्ट्रीय स्तरावर दहशतवादाविरुद्ध कठोर भूमिका घेतली आहे. पण आता या घटनेने पुन्हा एकदा दाखवले की, शब्दांपेक्षा कृतीचा काळ आला आहे. राजनैतिक दबाव, सीमा सुरक्षा, गुप्तचर यंत्रणांची अद्यावत क्षमता आणि सायबर-आधारित मॉनिटरिंग प्रणाली, हीच या नव्या काळाची शस्त्रं आहेत.



**- प्रवीण बागडे, नागपूर**
भ्रमणध्वनी: ९९२३६२०९१९
ई-मेल: pravinbagde@gmail.com

दिल्लीने आतापूर्वीही अशा प्रकारच्या भयकृत घटनांना सामोरे गेले आहे. ही पहिली वेळ नाही तर यापूर्वी २००५, २००८, २०११ आणि २०२१ मध्येही राजधानीत अशाच प्रकारचे स्फोट झाले. त्या आत्मघाती आणि स्फोटांची स्मृती ताजी आहे. अशा पार्श्वभूमीवर, जर तपासात पाकिस्तान-स्थित संघटनांचा ठोस पुरावा मिळाला, तर त्याचे राजनैतिक व सामरिक परिणाम ही दूरगामी असतील. परदेश धोरण, सीमा सुरक्षा आणि परस्पर विश्वास या सर्वांवर प्रभाव पडू शकतो. परंतु हे राजकीय परिणाम योग्य तपास व पुराव्यांवर अवलंबून असावेत; ज्या क्षणी तपास पूर्णपणे सिद्ध करणार त्या पुराव्यांचा आधार न घेताच घोषणा केल्या गेल्या तर चुकीचे निर्णय घेण्याची शक्यता वाढते. प्रत्येक वेळी सरकारने सुरक्षा वाढवण्याची, तपास जलदगतीने करण्याची घोषणा केली. परंतु काही महिन्यांनी तीच शिथिलता, तीच निष्क्रियता दिसून आली. आज पुन्हा तोच प्रश्न समोर आहे, आपली सुरक्षा फक्त फाईल्सपुरती आहे का?

त्याकरिता आपल्या सरकारकडून आणि समाजाकडून काही अपेक्षा आहेत. जसे कडक पण पारदर्शक तपास, सर्व पुरावे ताब्यात घेऊन, फॉरेन्सिक आणि सायबर तपास त्वरित आणि वैज्ञानिक पद्धतीने करणे आवश्यक आहे. एखाद्या देशावर आरोप करण्यापूर्वी आंतरराष्ट्रीय स्तरावरही पुरावे सादर करण्याजोगे असावेत. दुसरे असे की, स्थानीय सुरक्षा व्यवस्था मजबूत करणे, सार्वजनिक स्थळांवर तातडीने सुरक्षा बळ वाढवले पाहिजे; वाहन तपास, सीसीटीव्हीचे विश्लेषण आणि बायोमेट्रिक/फॉरेन्सिक क्षमता वाढवणे गरजेचे आहे. तिसरे, समावेशक सामाजिक प्रतिसाद, भय पसरवणाऱ्या प्रतिक्रीयांपासून बचाव करायला हवेत; चुकीच्या अफवांमुळे समाजात गुप्तमत निर्माण होऊ नये. पीडित कौटुंबिकांना तातडीची आर्थिक व मानसिक मदत देणे अत्यावश्यक आहे. तसेच, डिप्लोमॅटिक पिढी, जर परदेशी हात सिद्ध झाला तर तेथील कूटनीतिक चॅनेल्स आणि आंतरराष्ट्रीय न्यायालयीन प्रणालीचा वापर करून मुद्दा मांडला जावा. युद्धगाठ किंवा आक्रोशापेक्षा कायदेशीर व राजनैतिक मार्ग अधिक स्थायी असतात.

स्फोटाने उडवलेली शोकरात्र आणि जखमी लोकांची औषधासाठीची नजर. हे सगळे दर्शन आपल्याला विसरू नयेत. दुःखाचे क्षण सामाजिक सहकार्याने कमी होतातः रक्तदान, आर्थिक मदत आणि भावनिक आधार यांमुळेच पीडित कुटुंबांना उभारी येते. जर तपासात खऱ्या अर्थाने परदेशी गुन्हेगारांचे हात सापडलेही तरही आपली सुरक्षात्मक प्रतिक्रिया आणि न्याय मागणी मानवीय आणि कायदेशीर मार्गांनी केली पाहिजे. या स्फोटात गमावलेले जीव, जखमी झालेल्या निरपराध नागरिकांची वेदना आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या चेहऱ्यावर दिसणारे अविश्वासाचे सावट. हे सगळं एकत्र पाहिलं की प्रश्न पडतो, कधी थांबेल हा हिंसेचा खेळ? दहशतवादाला धर्म, देश किंवा विचारसरणी नसते. तो फक्त भीती निर्माण करतो, आणि ती भीती आपल्याला एकमेकांपासून दूर नेते. आज गरज आहे ती एकतेची, समजुतीची आणि सहानुभूतीची. स्फोटानंतर सर्वसामान्य नागरिकात निर्माण झालेली भीती स्वाभाविक आहे, परंतु अफवांवर विश्वास ठेवू नये, कारण दहशतवाद केवळ बॉम्बने नाही तर अफवांनीही मन उडवतो. आपण सजग राहून, संशयास्पद हालचालींची माहिती दिली, तर देशाचं सुरक्षा कवच अधिक मजबूत होईल.

दिल्लीतील कार स्फोटात झालेली हानी आणि सामाजिक धक्का अतिशय मोठा आहे. दिल्लीतील हा कार स्फोट फक्त राजधानीचा नाही, तर संपूर्ण भारताचा धक्का आहे. प्राथमिक तपासानुसार काही मीडिया अहवाल पाकिस्तान-आधारित संघटनांशी जोडलेले संदर्भ देतात, परंतु हे अंतिम निष्कर्ष नाहीत. तपास सुरू आहे आणि देशाने संयम राखून, पुराव्यांच्या आधारावर न्याय्य निर्णय घ्यावा. पीडितांना त्वरित मदत देणे, सुरक्षा मजबूत करणे आणि आंतरराष्ट्रीय कायदेशीर मार्ग वापरून दोषींवर कारवाई करणे, हे आपल्या देशाची जबाबदारी आहे. ही घटना आपल्याला सांगते की, सुरक्षा ही फक्त सरकारची जबाबदारी नाही, तर ती प्रत्येक नागरिकाची शपथ आहे. शेवटी, भयाच्या अंधारात मानवी सहानुभूतीच आपल्याला प्रकाशाकडे घेऊन जाईल. आपण भितीने नव्हे तर विश्वासाने पुढे गेलं पाहिजे, कारण प्रत्येक स्फोटानंतर राखेतून उभा राहणारा भारत हा जिद्दी, संयमी आणि न झुकणारा भारत आहे. या कार स्फोटावर पर्याय म्हणून सावध देश, सजग जनता आणि सशक्त सुरक्षा हवीच.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पंढरपूरात १ हजार ४२५ दुबार मतदार : दुबार मतदारांना द्यावे लागणार हमीपत्र

## सहाय्यक निवडणूक अधिकारी महेश रोकडे; पंढरपूर न.पा क्षेत्रातील दुबार मतदारांचे हमीपत्र घेण्याची कार्यवाही सुरु

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये पारदर्शकता आणि अचूकता राखण्यासाठी मतदार याद्यांमधील दुबार नावांची तपासणी करून योग्य ती दक्षता घेवून कार्यवाही करण्याचे निर्देश निवडणूक आयोगाने दिले आहेत. पंढरपूर नगरपालिका क्षेत्रात १ हजार ३७९ दुबार मतदार तर ४६ तिबार मतदार असे १ हजार ४२५ दुबार/तिबार मतदार असून, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार या सर्व मतदारांकडून कोणत्या प्रभागातील मतदान केंद्रांवर मतदान करणार याबाबतचे हमी पत्र घेण्यात येणार आहे. अशी माहिती सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ करीता दि.३१ ऑक्टोबर २०२५ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर मतदार यादीमध्ये १८ प्रभागातील २ हजार ८२७ ठिकाणी १ हजार ४२५ दुबार / तिबार मतदार नोंद झालेली आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये एकापेक्षा जास्त वेळा नाव असलेला मतदार हा प्रत्यक्षात एकच व्यक्ती आहे. याची खात्री झाल्यानंतर त्या मतदाराकडून तो नेमका कोणत्या प्रभागातील मतदार केंद्रावर मतदान करणार आहे. या बाबतचे हमीपत्र मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेकडून घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. दुबार मतदारांना विचारात घेऊन त्यांच्या पसंतीने एकाच प्रभागात मतदान करता येणार आहे. दुबार मतदार नोंदीची माहिती प्रत्येक मतदान केंद्रावर उपलब्ध केली जाणार आहे. संबंधित मतदार एकापेक्षा अधिक मतदान केंद्रावर मतदान करणार नाही, याची काळजी घेण्यात येणार आहे. संभाव्य दुबार नाव असलेल्या मतदाराकडून प्रतिसाद न मिळाल्यास असा मतदार मतदान केंद्रावर मतदान करण्यासाठी आल्यास त्या मतदाराकडून त्याचे नाव असलेल्या इतर कोणत्याही मतदान केंद्रावर मतदान केले नसल्याबाबत विहित नमुन्यातील हमीपत्र लिहून घेण्यात येईल. अशा मतदाराची काटेकोरपणे ओळख पटल्यानंतरच त्याला मतदान करण्याची मुभा देण्यात येईल. असेही सहाय्यक निवडणूक अधिकारी तथा मुख्याधिकारी महेश रोकडे यांनी सांगितले.

# स्व.पंडित नेहरू यांना अभिवादन



निफाड /प्रतिनिधी : निफाडची वाचन संस्कृती जोपासणाऱ्या श्री माणकेश्वर वाचनालय येथे आज दि. १४ रोजी भारताचे पहिले पंतप्रधान स्व. पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिवस व बालदिनाच्या निमित्ताने प्रतिमेस प्रवीण तनपुरे व संचालिका सुजाता तनपुरे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

तसेच सुजाता तनपुरे यांची निफाड तालुका माध्यमिक शिक्षक पतसंस्थेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल त्यांचा वाचनालयाच्या वतीने उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम यांच्या हस्ते शाल,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

याप्रसंगी वाचनालयाचे अध्यक्ष मधुकरराव शेलार,उपाध्यक्ष डॉ. मेघा जंगम, चिटणीस बाळासाहेब कापसे, सहचिटणीस राहुल दवते, हिशोब तपासणीस दत्ताकाका उगावकर, संचालक राजेंद्र खालकर, तनवीर राजे, सुहास सुरळीकर, बाळासाहेब कर्डिले यांसह प्रभारी ग्रंथपाल नितीन बनसोडे, अनिता इस्ते, नंदकुमार पुंड आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्तविक व सूत्रसंचालन सुहास सुरळीकर यांनी केले.

# कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयात फूड फेस्टिवल



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : उसाचा ताजा रस, पावभाजी, कचोरी, पाणीपुरी, सुगंधी दूध, फूड सॉलिड, थंड मठ्ठा, कोल्ड्रिंक्स, गरमागरम आप्पे आदींचा आस्वाद घेऊन विद्यार्थी तृप्त झाले. निमित्त होते कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयाकडून आयोजित फूड फेस्टिवल कार्यक्रम

विद्यार्थ्यांनी विविध कौशल्य आत्मसात करावी, उद्योग व्यवसायाची आवड निर्माण व्हावी म्हणून कल्याणशेट्टी कनिष्ठ महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने फूड फेस्टिवलचे आयोजन केले होते. संस्थेचे ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून फूड फेस्टिवलचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी संस्थेच्या संचालिका शांभवीताई कल्याणशेट्टी, सचिव मल्लिकार्जुन मसुती, ज्युनिअर विभाग प्रमुख पुनम कोकळगी, सेमी इंग्लिश विभाग प्रमुख रूपाली शहा, वरिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य राजेंद्रसिंह लोखंडे, प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

फूड फेस्टिवल उपक्रमाचे नियोजन पुनम पोकळगी यांच्या मार्गदर्शनानुसार प्रा सलोनी शहा, प्रा गुरुशांत हपाळे, शिल्पा धूम शेट्टी, संगीता स्वामी, शितल फुटाणे, मधुबाला लोणारी यांनी केले.

या उपक्रमाबद्दल संस्थेचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

फूड फेस्टिवल मधील विविध पदार्थांचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आस्वाद घेतला. या फेस्टिवल मधील साहित्याची मांडणी अतिशय नीटनेटके होते. सर्व विद्यार्थी युनिफॉर्म मध्ये उपस्थित होते.

# भाजपमधून जर निष्ठावंतांना उमेदवारी मिळाली नाही तर बंडखोरी करण्याचा इशारा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**





पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर नगरपालिका २०२५ त्या अनुषंगाने आज दिनांक १३/११/२०२५ रोजी श्री बाळासाहेब बडवे यांच्या निवासस्थानी भाजपच्या जुन्या प्रमुख निष्ठावंत कार्यकर्त्यांची बैठक पार पडली त्यामध्ये मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते आणि या बैठकीला पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे विद्यमान आमदार समाधान आवताडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पंढरपूर शहरासाठी एकूण १५ कार्यकर्त्यांनी उमेदवारीसाठी अधिकृत पक्षाच्या चिन्हावर कमळ निवडणूक लढवण्यासाठी हरितसर मागणी केली यावेळी आमदार अवताडे यांनी आपली भूमिका पक्षासमोर ठेवून जास्तीत जास्त उमेदवारांना जुन्या निष्ठावंत कार्यकर्त्यांना उमेदवारीसाठी पक्ष नेतृत्वाकडे आग्रही मागणी करून प्रयत्न करू असा ठाम विश्वास या बैठकीत व्यक्त केला उमेदवारी मिळाली नाही तर बंडखोरी करण्याचा इशाराही यावेळी अनेक यांनी व्यक्त केला.

**आमदार समाधान आवताडे यांनी पक्षाकडे मागणी करण्याचा दिला शब्द**

या बैठकीत पंढरपूर तालुक्यातील जुने निष्ठावंत कार्यकर्ते माजी शहराध्यक्ष दत्ताशिवाय रजपूत, उमेश वाघोलीकर, बाळासाहेब बडवे, काशिनाथ थिटे, सुरेशराव खेस्ते, गिरीश कटेकर वालचंद जमादार गुजराती, श्याम तापडिया शकुंतला नडगिरी रेखाताई कुलकर्णी अर्पणा तारखे शशिकांत सुगंधी , विठुरादतराव आदित्य जोशी अण्णा धोत्रे अनुप देवधर गिरीश आराध्य सुरेंद्र कटेकर डॉक्टर शशिकांत धायतडक, अरुण पिंपळनेर, संजय पालकर, नितीन कारंडे कैलास कारंडे, दापोली गाडी सौरभ थिटे, धनंजय बडवे वरद सिंह रजपूत, गोलू रखेरी यांच्यासह बहुसंख्य कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नगरपरिषद व नगरपंचायत निवडणूक २०२५

## जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती स्थापन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर (जिमाका) : राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र मुंबई यांच्या निर्देशानुसार नगरपरिषद व नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची स्थापना करण्यात आली आहे. ही समिती दिनांक ११ नोव्हेंबर २०२५ रोजी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आली.

या समितीचा उद्देश निवडणूक कालावधीत प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाऱ्या राजकीय जाहिरातींची तपासणी, प्रमाणीकरण आणि संनियंत्रण करणे हा आहे. जिल्हा माहिती अधिकारी हे समितीचे सदस्य सचिव तथा नोडल अधिकारी म्हणून कार्य करतील.

समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश आहे:

- जिल्हा पोलीस अधीक्षक, सोलापूर
- निवासी उपजिल्हाधिकारी, सोलापूर
- संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी
- संबंधित नगरपरिषद / नगरपंचायतचे मुख्याधिकारी

ही समिती मीडिया मॉनिटरिंग कमिटी (चउचउ) म्हणून कार्य करणार असून, निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रिंट, इलेक्ट्रॉनिक, सोशल मीडिया आणि इतर डिजिटल माध्यमांवरील राजकीय जाहिरातींचे परीक्षण व प्रमाणीकरण करणार आहे.

जिल्हा प्रशासनाच्या वतीने सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि प्रसारमाध्यम प्रतिनिधींना आवाहन करण्यात येते की, प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या सर्व जाहिराती या समितीकडून प्रमाणित करूनच प्रसारित कराव्यात, जेणेकरून निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि कायद्याच्या चौकटीत राहील.

# औसा कॉँग्रेस तालुकाध्यक्षपदी कीरणबापु बाबळसुरे यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



औसा प्रतिनिधी/अमर जाधव : औसा तालुक्यातील किल्लारी येथील गेल्या चाळीस वर्षापासुन कॉंग्रेसचे निष्ठावंत कार्यकर्ते मनुन नावलौकीक असलेले किरण बाबळसुरे यांची कॉँग्रेसच्या औसा तालुकाअध्यक्षपदी निवड करण्यात आली ,किरण बाबळसुरे यांनी किल्लारीचे सरपंच ,सोसायटी चेअरमन सह अनेक पद भुषवले आहेत ,आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका तोंडावर आल्याने कॉँग्रेस पक्षाला बळकटी देत आगामी निवडणुकात पक्ष संघटण मजबुत व्हावे यासाठी खांदेपालट करण्यात आला असुन सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख ,आ.अमितभैया देशमुख व मा.आ.जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज भैया देशमुख यांच्या सुचनेने जिल्हाध्यक्ष अभयदादा साळुंके व मा.जिल्हाध्यक्ष श्रीशैल्य आप्पा उटगे नेतृत्वाखाली जिल्यातील सर्वच तालुक्याच्या तालुकाध्यक्षांची निवड करण्यात आली असुन औसा तालुकाध्यक्षपदी कीरणबापु बाबळसुरे यांची निवड करण्यात आली असुन येणार्या काळात कॉँग्रेस पक्ष संघटण मजबुत करत पक्षाला बळकटी देण्यासाठी आम्ही एकजुटीने काम करणार असल्याचे नवनिर्वाचीत तालुकाध्यक्ष कीरणबापु बाबळसुरे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगीतले .व आगामी निवडणुका ताकदीने लढुन जिंकण्याचा निर्धार व्यक्त केला.

यावेळी अँड बाबासाहेब गायकवाड- माजी सभापती समाज कल्याण, प्रदेश सरचिटणीस अमर खानापुरे, महादेव पाटील-( माजी संचालक किल्लारी शेतकरी सहकारी साखर कारखाना) नारायण आबा लोखंडे- जिल्हा परिषद उपाध्यक्ष, प्रकाश माधवराव मिरगे - माजी पंचायत समिती सदस्य, पांडुरंग चेवले (माजी जिल्हा परिषद सदस्य ), दत्तोपंत सूर्यवंशी (माजी तालुकाध्यक्ष कॉँग्रेस ), बाळासाहेब सांगवे, नामदेव माने, महादेव बिराजदार (अध्यक्ष कॉँग्रेस सेवादल ), अजमेर शेख ( ता.युवक कॉँग्रेस उपाध्यक्ष ), संजय लोंढे (युवक कॉँग्रेस ता. कार्याध्यक्ष), व्यंकट आडगळे सह कॉँग्रेस कार्यकर्त्यांनी कीरणबापु बाबळसुरे यांचे निवडीबद्धल अभिनंदन केले

# बोगस शाळांवर तात्काळ कारवाईची गावकऱ्यांची मागणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नांदोरे/प्रतिनिधी : नांदोरे येथे घडलेल्या हृदयद्रावक दुर्घटनेनंतर परिसरात तीव्र संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. दयानंद कदम यांचा १२ वर्षीय मुलगा राजवीर कदम शाळेतून घरी परतत असताना ज्ञानदीप प्रोग्रेस स्कूलच्या खाजगी बसने बेफिकीरपणे वाहन चालवत चिरडून ठार केल्याची घटना काही दिवसांपूर्वी घडली. या दुर्घटनेमुळे गावात शोककळा पसरली आहे.

**माऊली भाऊ हळणवर यांनी पीडित कुटुंबियांची घेतली भेट**

आज माऊली भाऊ हळणवर यांनी कदम कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन पर भेट दिली. यावेळी गावकऱ्यांनी परिसरातील गंभीर समस्या समोर मांडल्या.

ग्रामस्थांनी सांगितले की नांदोरे परिसरात दोन ते तीन खाजगी शैक्षणिक संस्था असून, या शाळांच्या स्क्रॅप मध्ये निघणाऱ्या सुमारे ५० ते ६० खाजगी बसेस विद्यार्थ्यांची वाहतूक करतात. मात्र, या बसकडे आवश्यक कागदपत्रे नाहीत, प्रशिक्षित ड्रायव्हर नाहीत आणि वाहतुकीचे कुठलेही नियम पाळले जात नाहीत. त्यामुळे मुलांच्या जिवीतास मोठा धोका निर्माण झाला आहे.

तसेच, या शाळांमध्ये दहावी-बारावी परीक्षेदरम्यान बाहेरील जिल्ह्यांमधील विद्यार्थ्यांना बसवून २ ते ३ लाख रुपये घेऊन कॉपी करून पास केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. हा शिक्षण क्षेत्रातील गोरखधंदा गेली अनेक वर्षे सुरू असल्याची माहितीही समोर आली.

दरम्यान, पीडब्ल्यूडी च्या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण झाल्याचेही ग्रामस्थांनी सांगितले. राजवीरच्या मृत्यूने संतप्त झालेल्या गावकऱ्यांनी एकत्र येत रस्त्यावरील अतिक्रमणे हटवली.

ग्रामस्थांनी प्रशासनाला इशारा देत सांगितले की-

या खाजगी शाळांच्या ५० ते ६० बसेसवर तात्काळ कारवाई करा; अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल.

**'बालदिनी' वैनतेय विद्यामंदिरातील चिमुकल्यांच्या उत्साहाला उधाण**

**बालदिनानिमित्त विशेष उपक्रम**

# विटी-दांडू, भोवरा, लगोरी, सूर-पारंब्या या पारंपारीक खेळातून संस्कृती संवर्धन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : मोबाईल, लॅपटॉप, इंटरनेट, व्हिडीओ गेम यामधील आधुनिक बैठे खेळात गुंतलेल्या आजच्या पिढीला बालदिनानिमित्त विटी-दांडू, लगोरी, भोवरा, सूर पारंब्या, गोट्या, डबा स्पाईस यांसारख्या पारंपारिक खेळातून विद्यार्थ्यांना मैदानी खेळाची आवड निर्माण करण्याचा यशस्वी उपक्रम वैनतेय प्राथमिक विद्यामंदिर निफाड शाळेतील शिक्षक गोरख सानप यांनी राबविला.

स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांचा जन्मदिन देशभरात 'बालदिन' म्हणून साजरा करण्यात येतो. लहान मुलांचे आवडते 'चाचा नेहरू' यांच्या प्रतिमेचे पूजन विद्यार्थ्यांच्या हस्ते करण्यात आले. 'प्रत्येक बालकासाठी,प्रत्येक हक्क' ही या वर्षाच्या बालदिनाची संकल्पना आहे. मुलांना बालपणापासूनच मैदानी खेळाची आवड निर्माण झाली तर देशाची भावी पिढी शरीराने व मनाने आरोग्यसंपन्न तयार होईल. शिक्षक गोरख सानप यांनी मुलांना विटी-दांडू, भोवरा, लगोरी, गोट्या,आट्या-पाट्या, अम्पल-चम्पल, सागरगोट्या, टायर फिरवणे, मामाचं पत्र, डबा स्पाईस, भातुकली, सूर पारंब्या, लपाछपी, झोके, रिंगा, आबुधाबी, चप्पी-चप्पी, पोत्यांची शर्यत यांसारख्या खेळांची माहीती करून देत त्यांना या खेळासाठी आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. विद्यार्थ्यांनी मनसोक्त खेळाचा आनंद घेत चिंचा, बोरं, पेरू, आवळे या रानमेव्याची चव चाखली. पारंपारीक, देशी



**मुलं ही खरी देशाची संपत्ती आहे. मुलं काय शिकतात यापेक्षा त्यांच्यावर काय संस्कार होतात हे पालक व शिक्षकांनी पाहिले पाहिजे. मोबाईल,व्हिडिओ गेमच्या वापराने दृष्टिदोष, मानेचे व मनक्यांच्या व्याधी टाळून बालदिनानिमित्त पारंपारीक खेळांच्या माध्यमातून चिमुकल्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविलेला हा उपक्रम कौतुकास पात्र आहे.**

**- वि. दा. व्यवहारे, अध्यक्ष**
**न्या रानडे विद्याप्रसारक मंडळ, निफाड**

खेळ खेळण्यात चिमुकले दंग झाले. कोणताही खर्च न करता अल्प-खर्चीक, व सहज उपलब्ध होणाऱ्या साहित्यातून पारंपारिक खेळातून विद्यार्थ्यांचा उत्तम व्यायाम तर होतोच, त्यासोबत खिलाडूवृत्ती, नेतृत्वगुण, मित्रप्रेम, संघप्रवृत्ती, जिद्द, चिकाटी, चुरस, उत्साह अशा विविध गुणांचा विकास होण्यासही मदत होते.



कालबाह्य होत चाललेल्या पारंपारीक खेळातून महाराष्ट्राच्या संस्कृतीचे संवर्धन करणा-या तसेच बालदिनी बालकांच्या चेह-यावर हसू व आनंदाला उधाण देणा-या या उपक्रमाचे न्या. रानडे विद्याप्रसारक मंडळ निफाड संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष वि. दा. व्यवहारे, सचिव रतन वडघुले, विश्वस्त किरण कापसे, राजेंद्र राठी, राजेश सोनी, ड. दिलीप वाघावकर, विश्वास कराड, मधुकर राऊत, प्रभाकर कुयटे, नरेंद्र नांदे, निफाड पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी विलास साळी, विस्तार अधिकारी लता भरसट,कैलास बोरसे, वसंत गायकवाड, केंद्रप्रमुख अनिता आहिरे व पालकांनी कौतुक केले.

# राज्यात एकसमान मानक कार्यपद्धती विकसित : सचिव तुकाराम मुंढे

## दिव्यांग व्यक्तीचा छळ, हिंसाचार शोषणाविरुद्ध प्रभावी संरक्षणासाठी शासन निर्णय निर्गमित; दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी जिल्हा व उपविभागीय दंडाधिकाऱ्यांना कारवाईचे अधिकार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणारे छळ, हिंसाचार आणि शोषणाच्या घटनांवर प्रभावी नियंत्रण आणण्यासाठी तसेच त्यांच्या हक्कांचे आणि सुरक्षिततेचे संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागामार्फत शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ७ नुसार, दिव्यांग व्यक्तींच्यावरील अत्याचारांविरुद्ध त्वरित आणि प्रभावी कार्यवाही करणे बंधनकारक आहे. त्यानुसार उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांना अशा प्रकरणांवर कायदेशीर तसेच प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये या तरतुदींच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी एकसमान मानक कार्यपद्धती विकसित करण्यात आली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले.

सचिव मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणारे छळ, हिंसाचार आणि शोषण रोखणे तसेच पीडितांना न्याय, संरक्षण आणि सन्मान मिळवून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. या कार्यपद्धतीद्वारे अशा घटनांवरील तक्रारींचे निवारण, तात्काळ कारवाई, संरक्षणात्मक उपाय, वैद्यकीय मदत, पुनर्वसन आणि कायदेशीर सहाय्य यासाठी स्पष्ट दिशा-निर्देश निश्चित केले जातील. यामुळे राज्यभर एकसमान, पारदर्शक आणि परिणामकारक प्रणाली कार्यान्वित होऊन दिव्यांग व्यक्तींच्या सुरक्षेचे आणि सन्मानाचे रक्षण अधिक बळकट होईल, असा शासनाचा उद्देश आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ च्या कलम ९२ नुसार, दिव्यांग व्यक्तींच्या विरोधात होणाऱ्या छळ, हिंसाचार आणि शोषण करणाऱ्या व्यक्तींना किमान सहा महिने आणि



कमाल पाच वर्षे कारावासाची शिक्षा तसेच दंडाची तरतूद असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

सक्षम प्राधिकारींची भूमिका

उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी हे दिव्यांग व्यक्तींवरील छळ, हिंसाचार आणि शोषणाच्या घटनांची दखल घेऊन त्वरित प्रतिबंधात्मक पावले उचलतील. तसेच पिडीत व्यक्तीचे संरक्षण, वैद्यकीय मदत आणि पुनर्वसन यासाठी आवश्यक मदत करतील. अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे ही त्यांची जबाबदारी असेल.

तक्रारींची कार्यवाही प्रक्रिया

दिव्यांग व्यक्ती किंवा त्यांचे प्रतिनिधी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करू शकतात. पोलिसांकडून ही तक्रार संबंधित उपविभागीय किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे पाठवली जाईल. दंडाधिकारी दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ आणि फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करतील. आवश्यक असल्यास, दंडाधिकारी स्वतःहून कारवाईही सुरू करू शकतात.

कारवाईची व्याप्ती

तक्रार प्राप्त झाल्यानंतर दंडाधिकारी त्वरित प्रतिबंधात्मक आणि संरक्षणात्मक उपाययोजना करतील. पिडीतास सुरक्षा, वैद्यकीय मदत व पुनर्वसन सुविधा देण्याचे निर्देश पोलिस तसेच प्रशासनाला देतील.

अहवाल सादरीकरणाची प्रक्रिया

प्रत्येक जिल्ह्यातील पोलीस आयुक्त, पोलीस अधीक्षक, उपविभागीय दंडाधिकारी आणि जिल्हा दंडाधिकारी यांनी दिव्यांगत्व समितीला मासिक अहवाल सादर करणे आवश्यक आहे. जिल्हा दिव्यांगत्व समितीचा एकत्रित अहवाल प्रत्येक महिन्याला राज्य दिव्यांग आयुक्तांकडे पाठविला जाईल. राज्य दिव्यांग आयुक्त तिमाही आढावा घेऊन शासनास अहवाल सादर करतील. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या ू. ारहरीरीहींीर.सीं.ळप या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२५१११३१६०७५५०२३५ आहे.

# सिंदखेडराजा नगर परिषद निवडणूकीसाठी प्रशासन सज्ज



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : महाराष्ट्र नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ निवडणूक कार्यक्रमाची तय्यारी जोरदार सुरु असून त्याअनुषंगाने आज दिनांक १४ नोव्हेंबर २०२५ रोजी मा. निवडणुक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे आणि मा. उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांनी नगर परिषद निवडणूक विभागाला भेट देऊन पाहणी केली.

प्रा.संजय खडसे आणि श्री मनीषा कदम यांनी मतदान सुरक्षा कक्षाला भेट देऊन सुरक्षा कक्षाची पाहणी केली. मतदान सुरक्षा कक्षामध्ये लाईट तसेच आवश्यक लागणाऱ्या सर्व सुविधांची खातरजमा करून घेतली तसेच मतदान सुरक्षा कक्षामध्ये एतच् मशीन ठेवल्यापासून ते प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत कशाप्रकारे मतदान सुरक्षा कक्षाची व्यवस्था हाताळली पाहिजे याबद्दल निवडणूक अधिकारी तसेच कर्मचारी यांना प्रा. खडसे यांनी मार्गदर्शन केले.

आज च्या पाहणीमध्ये मतमोजणी केंद्राला सुद्धा भेट देऊन त्या कक्षाची पाहणी करण्यात आली. मतमोजणी केंद्र हे निवडणूक प्रक्रियेमधील खूप संवेदनशील कक्ष असतो, त्या कक्षामध्ये टेबलं व्यवस्था कशी असली पाहिजे, एतच् मशीन कश्या पद्धतीने हाताळायला पाहिजे, बैठक व्यवस्था कशी असली पाहिजे, बाकी सर्व प्रकारच्या सुविधा पुरवण्यासाठी प्रशासनाला सूचना प्रा. खडसे यांनी दिल्या.

> **मतदान सुरक्षा कक्ष तसेच मतमोजणी केंद्राची निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम यांच्याकडून पाहणी**

मतदान सुरक्षा कक्ष, मतमोजणी केंद्र अश्या महत्वाच्या संवेदनशील कक्षामध्ये पोलीस प्रशासनाची भूमिका ही निर्णायक असते. या दोन्ही कक्षासाठी सुरक्षा पुरवण्याचे काम पोलीस विभागाने चोख पार पाडावे अश्या प्रकारच्या सूचना उपविभागीय पोलीस अधिकारी (ऊ्रडझ) मनीषा कदम यांनी पोलीस प्रशासनाला दिल्या.

उपस्थित सर्व अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांना त्यांना मा. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नेमून दिलेली जबाबदारी योग्य रित्या पार पाडावी तसेच काही समस्या येत असतील तर संबंधित अधिकाऱ्यांना कळवाव्यात अश्या प्रकारच्या सूचना प्रा. खडसे यांनी दिल्या.

आजच्या या पाहणी दौऱ्यासाठी निवडणूक निर्णय अधिकारी प्रा. संजय खडसे, उपविभागीय पोलीस अधिकारी मनीषा कदम, तहसीलदार अजित दिवटे, मुख्याधिकारी डॉ. आशिष बोबडे, नायब तहसीलदार नितीन बढे, पोलीस निरीक्षक आशिष इंगळे,शहर अभियंता काझी इत्यादी उपस्थित होते.

# राष्ट्रीय बाल दिनानिमित्त झोपडपट्टी परिसरातील मुलांना खाऊ वाटप



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : १४ नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय बाल दिन म्हणून साजरा केला जातो व पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त साजरा होणाऱ्या या दिनाचे औचित्य साधून शिक्षणापासून व शाळेपासून वंचित असलेल्या झोपडपट्टी परिसरातील लहान मुलांना क्रीम बिस्किट,केक,डेरी मिल्क चॉकलेट अशा गोड-धोड पदार्थ वाटून त्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवला.

या खाऊ वाटप उपक्रमाला मोहसीन मोकाशी, अब्दुल हनान अत्तार, रशीद खिस्तके, अकीब बागवान, मुबिन अन्सारी सर, सामाजिक कार्यकर्ते सोहेल फरास यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

झोपडपट्टी परिसरातील २५ ते ३० लहान मुलांना व महिलाना खाऊ वाटप करण्यात आले.या वेळी सोहेल फरास, मोहसीन मोकाशी, अब्दुल हनान अत्तार, रशीद खिस्तके, अकीब बागवान, मुबिन अन्सारी सर, अशरफ गोलंदाज, अल्ताफ बागवान आदी उपस्थित होते.

सोहेल फरास सामाजिक कार्यकर्ते अक्कलकोट

# स्वेरी महाविद्यालयाचा इंटी विद्यापीठ, मलेशिया येथील अभ्यास दौरा संपन्न




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील श्री विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूट संचलित कॉलेज ऑफ इंजिनिअरींग मधील विद्यार्थी व प्राध्यापक प्रतिनिधी मंडळ यांचा मलेशियातील इंटी (आयएनटीआय) विद्यापीठ येथे तीन आठवड्यांचा शैक्षणिक अध्ययन दौरा नुकताच पार पडला. हा अभ्यास दौरा संस्थेच्या जागतिक संबंधांना अधिक दृढ करण्याच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरला आहे.

इंटी विद्यापीठ हे १९८६ मध्ये स्थापन झाले असून मलेशियातील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक आहे. या विद्यापीठाने क्यु.एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ मध्ये ५०९ वा क्रमांक मिळविला आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक स्तरावर शिकण्याची, प्रगत तंत्रज्ञानाची आणि करिअरच्या संधींची थेट ओळख व्हावी यासाठी संस्थेचे संस्थापक व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी. रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम. पवार यांच्या सहकार्याने, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार व ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या नेतृत्वाखाली हा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता. या दौऱ्याची ठळक वैशिष्ट्ये म्हणजे अत्याधुनिक तंत्रज्ञान व सध्याच्या व्यावसायिक जगतातील प्रवाहांची माहिती मिळविणे, आंतरराष्ट्रीय स्तरावर संबंध प्रस्थापित करण्याची संधी, विद्यार्थ्यांना जागतिक पातळीवर करिअर घडविण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन ही आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि आंतरराष्ट्रीय शिक्षणक्षेत्राशी निगडित नवीन दालने खुली होत आहेत. या दौऱ्यात कार्यशाळा आणि प्रकल्पाधारित शिक्षण या बाबींवर मुख्य भर देण्यात आला होता. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) या विषयावर डॉ. एम. झियाद यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजिलेल्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना 'एआय टूल्स, मशिन लर्नींग आणि डेटा एनॅलिसीस' या संदर्भात प्रशिक्षण देण्यात आले. या दरम्यान विद्यार्थ्यांना इमेज रेक्गनायझेशन, ऑब्जेक्ट डीटेक्शन, टेक्स्ट समरायझेशन, एआय बेस्ड प्रेडिक्शन मॉडेल्स यांसारख्या अत्याधुनिक विषयांची सखोल माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी एआय वापरून वास्तव जीवनातील समस्या सोडवणारे प्रकल्प तयार केले, जसे की स्मार्ट सिस्टीम्स, ऑटोमेशन साधने आणि एआय - आधारित सोल्यूशन्स या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना तांत्रिक कौशल्या सोबतच नवनिर्मितीची प्रेरणा मिळाली. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी पायथॉन आधारित लायब्ररी वापरून डेटा क्लिनिंग, मॉडेल ट्रेनींग आणि मॉडेल अॅक्युरसी टेस्टींग यांसारखी कौशल्ये आत्मसात केली. त्यानंतर संगीत आणि स्थानिक भाषेच्या शिकवणींचा अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला. त्यासाठी इंटी विद्यापीठाने विद्यार्थ्यांसाठी ट्रॅडीशनल म्युझीक लर्नींगचे आयोजन केले होते. यामध्ये विद्यार्थ्यांना मलेशियाच्या गेमलन, अंग्कलुंग वादन आणि स्थानिक लोकसंगीत अशा पारंपरिक संगीत शैलींबद्दल मार्गदर्शन केले गेले. विद्यार्थ्यांनी प्रात्यक्षिकात संगीताच्या तालावर भारतीय शास्त्रीय संगीताचे सूर मिसळून एक अनोखा सांस्कृतिक संगम तयार केला. त्याचबरोबर स्थानिक मल्य भाषेची ओळख करून घेतली. त्यातुन स्थानिक संवाद कौशल्ये, उच्चार व सांस्कृतिक अभिव्यक्ती यांचा लाभ घेतला. यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास अधिक वाढला. त्यामुळे स्थानिक विद्यार्थ्यांशी अधिक प्रभावी संवाद साधता आला. फिजिओथेरपी आणि आरोग्य याविषयी सुद्धा त्यांना प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये स्थानिक प्रशिक्षकांनी विद्यार्थ्यांना मानवी शरीराची स्थिती, व्यायामाची योग्य पद्धत, स्नायूंचे आरोग्य राखण्याचे मार्ग तसेच तणाव व्यवस्थापन आणि फिटनेसचे तत्त्वज्ञान दिल्यामुळे विद्यार्थ्यांना शारीरिक व मानसिक आरोग्याचे महत्त्व उमगले. त्यानंतर संशोधन व विकास यावर देखील भर देण्यात आला. त्यातून विद्यार्थ्यांना नवनवीन संशोधन प्रकल्पांची माहिती मिळाली. प्रयोगशाळेतील अत्याधुनिक उपकरणांचा वापर, डेटा संकलन पद्धती, संशोधन लेखन आणि प्रेझेंटेशन तंत्रज्ञान यांचे देखील विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय संशोधन पद्धती आणि जागतिक मानकांचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. यानंतर आंतरराष्ट्रीय अनुभव, ज्ञान, संस्कृती आणि आत्मविश्वासाचा संगम साधताना विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक नव्हे तर सांस्कृतिक, सामाजिक आणि वैयक्तिक विकासासाठीही व्यासपीठ उपलब्ध करून दिले गेले. एकूणच इंटी विद्यापीठ, मलेशियाचे संचालक डॉ. अशोकन वासुदेवन यांनी या अभ्यास दौऱ्या दरम्यान महत्वाचे मार्गदर्शन केले. भारतीय आणि मलेशियन विद्यार्थ्यांमधील संस्कृतीचा संवाद, स्थानिक परंपरांचा आदर आणि जागतिक दृष्टिकोन यामुळे हा दौरा संस्मरणीय ठरला.

या अभ्यास दौऱ्यात प्रा. आशुतोष गरड यांच्या सह १४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. मलेशियाच्या या दौऱ्यामुळे स्वेरीतील संशोधनाला आणखी गती मिळाली आहे, हे मात्र निश्चित!

**परिसरात घबराटीचे वातावरण**

# बापंगाव येथे पतीने केली पत्नीची निर्घृण हत्या : अल्पावधीत पोलीसांनी पतीला ठोकल्या बेड्या




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : भिवंडी तालुक्यातील बापंगाव येथे चारित्र्याच्या संशयावरून पतीने पत्नीची धार धार शस्त्राने गळा चिरून निर्घृण हत्या केल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले आहे. अनिता बेरडीया (४७)असे हत्या झालेल्या पत्नीचे नाव असुन ती मुलासोबत पतीला सोडुन आर्या रेसीडेन्सी मल्हार नगर बापंगाव येथे विभक्त राहत होती तर पती मोहन बेरडीया(४८) भिवंडी तालुक्यातील देवरुंग येथे मोठ्या मुलांसोबत राहत होता पती मोहन बेरडीया हा अनिता हीच्या चारित्र्यावरून नेहमी संशय घेऊन मारहाण करीत होता. तसेच चारित्र्याच्या संशयावरून त्या दोघांच्यात नेहमी खटके उडत होते १० नोव्हेंबर रोजी अनिता बेरडीया हीचा विवस्त्र अवस्थेतील मृतदेह तीच्या मुलानां व पोलीसांना बापंगाव येथील राहत्या घरी आढळून आला होता. त्यामुळे अनिता हीचा मुलगा हितेश मोहन बेरडीया याच्या तक्रारी वरुन पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता कुठलाही पुरावा नसताना पडघा पोलीसांनी आपले स्त्रोत वापरून पती मोहन बेरडीया याला ताब्यात घेऊन पोलीस खाक्या दाखवुन चौकशी केली असता त्याने पत्नी अनिता हीची हत्या केल्याची कबुली दिली. पडघा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करुन पती मोहन बेरडीया याला अटक केली आहे. सदर घटनेचा अधिक तपास पडघा पोलीस करीत आहेत.

# आई बाबा फाऊंडेशनतर्फे बालदिन उत्साहात साजरा



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

घाटकोपर,(केतन भोज);आई बाबा फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या वतीने आज बालदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.समाजातील रस्त्यावरील अनाथ, गोरगरिब आणि उपेक्षित मुलांना आनंदाचा क्षण देण्याच्या उद्देशाने संस्थेने विशेष कार्यक्रमाचे आयोजन केले.या उपक्रमात आई बाबा फाऊंडेशनचे अध्यक्ष योगेश मौर्य यांनी स्वतः उपस्थित राहून मुलांसोबत बालदिन साजरा केला. कार्यक्रमादरम्यान शेकडो मुलांना बॅडमिंटन किट, खाऊचे पॅकेट, खेळण्याचे साहित्य तसेच इतर आवश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. लहान मुलांच्या चेहऱ्यावर उमटलेले आनंदाचे भाव हा उपक्रम अधिक अर्थपूर्ण ठरवणारा क्षण होता.आई बाबा फाऊंडेशन ही संस्था गेली काही वर्षे समाजातील वंचित घटकांसाठी विविध उपक्रम राबवत असून विशेषतः अनाथ आणि गोरगरिब मुलांच्या शैक्षणिक गरजा, त्यांना लागणारे साहित्य, मार्गदर्शन, तसेच प्रोत्साहन देण्याचे काम सातत्याने करत आहे.समाजातील मुलांना शिक्षण,क्रीडा आणि संस्कारांची जोड मिळावी या उद्देशाने संस्था वर्षभर विविध उपक्रम, शिबिरे आणि जनजागृती मोहिमा राबवते.